महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांकः प्रतिनि २०१८/(प्र.क्र. १०६ /२०१८)/का.१४
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २५ मे, २०१८

आदेश

श्री.मु.प्र.देशपांडे, अवर सचिव, गृह विभाग (सध्या उप सचिव, राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ) यांच्या सेवा वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, धरमपेठ, नागपूर या कार्यालयातील निबंधक तथा सहायक प्राध्यापक या पदावर प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

अ) श्री.मु.प्र.देशपांडे, अवर सचिव ज्या तारखेला प्रतिनियुक्तीच्या पदावर रूजू होतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला तो आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्विकारील त्या तारखेला समाप्त होईल.

ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन/सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

क) जर त्यांची सेवा स्वीयेतर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेतर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेतर नियोक्त्याने शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे; आणि

ड) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा... इ.) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट दोन) मधील तरतुदी विचारात घेऊन गृह विभाग व सामान्य प्रशासन विभाग यांनी प्रतिनियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती आपआपसात ठरवाव्यात.

३. श्री.मु.प्र.देशपांडे, अवर सचिव यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी गृह विभागामार्फत हाताळण्यात येतील.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२५१७०४१७०४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ad a8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f 73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.05.25 17:02:24 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री.मु.प्र.देशपांडे, उप सचिव, राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ

प्रत

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. अ.मु.स.(सेवा),सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई,
४. अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, गृह विभाग / सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. सचिव, मुख्य राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई
६. सह सचिव / उप सचिव (कार्या.६) / (कार्या.१२अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सह सचिव / उप सचिव (आस्थापना), गृह विभाग / सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. निवडनस्ती कार्यासन-१४